# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – 411 018
## कर आकारणी व कर संकलन विभाग

## जाहीर प्रकटन

### ऑनलाईन पध्दतीने आकारणी पुस्तकातील नोंदी व मालमत्ता उतारा

कर आकारणी व करसंकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार मालमत्ता कराची आकारणी व वसूलीची कार्यवाही करणेत येते. यासाठी करसंकलन विभागीय कार्यालये कार्यरत असून या कार्यालयांचे हद्दीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 9 नुसार सध्या हस्तलिखित पद्धतीने सध्या गट निहाय मालमत्तेच्या आकारणी पुस्तकामध्ये (Assessment Register) नोंदी घेण्यात येतात व नागरिकांना हस्तलिखित मालमत्ता उतारा देणेची कार्यवाही करणेत येत आहे.

शहराचे वाढते नागरीकरण व वाढती मालमत्ता संख्या विचारात घेता, नागरिकांना सुलभ व जलद सेवा प्रदान करणेचे दृष्टीने मालमत्ता निहाय ऑनलाईन आकारणी पुस्तकात दिनांक 01 जानेवारी 2024 पासून मालमत्ता नोंदी व फेरफाराच्या नोंदी घेणेची कार्यवाही करणेबाबत मा. प्रशासक यांचेकडील मा. स्थायी समिती सभा मंजूर ठराव क्रमांक 2711, दिनांक 26/12/2023 नुसार मान्यता देणेत आली आहे, त्यानुसार खालील कार्यपध्दती अंमलात राहिल.

1. सध्या गटनिहाय हस्तलिखीत पद्धतीने मालमत्तेची नोंद आकारणी पुस्तकात (Assessment Register) घेणेत येते. या पद्धतीत दिनांक 01 जानेवारी 2024 पासून बदल करणेत येऊन मालमत्तानिहाय ऑनलाईन पद्धतीने नवीन मालमत्तेची नोंद घेणेची कार्यवाही करणेत येणार आहे.
2. नवीन मालमत्तेचे करयोग्य मूल्य निश्चित झालेनंतर मालमत्तेसंबंधी ऑनलाईन आकारणी पुस्तकात मालमत्तेचे मालक / भोगवटादार नाव, मालमत्तेचा स्थानिक अचूक पत्ता, वर्णन, बांधकाम दर्जा, क्षेत्रफळ, मालमत्ता आकारणी तपशील, ज्या आदेशान्वये करयोग्य मुल्य निश्चित करणेत आले त्याचा तपशील, मालमत्तेचे स्वरुप, फेरफार नोंदी, दुरुस्ती इत्यादी संबंधी नोंदी नमूद असतील. नागरिकांना असा मालमत्ता नोंदीचा उतारा महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरुन उपलब्ध होणार आहे.
3. मालमत्तांनिहाय आकारणी पुस्तकांत दिनांक 01 जानेवारी 2024 नंतर नोंद घेतलेल्या मालमत्तां प्रकरणी मालमत्तेमध्ये त्यानंतर वाढ / घट / दुरूस्ती / हस्तांतरण / फेरफार इत्यादी बाबी घडल्यास अशा आदेशांच्या नोंदी घेण्यात येणार आहेत.
4. दिनांक 01 जानेवारी 2024 पासून नवीन मालमत्तेचे ऑनलाईन आकारणी पुस्तक (Assessment Register) कार्यान्वित होणार आहे. त्याबरोबर दिनांक 31 डिसेंबर 2023 पर्यंत सध्याचे हस्तलिखीत आकारणी पुस्तकात (Assessment Register) नोंद असलेल्या मालमत्तांचे देखील मालमत्तानिहाय ऑनलाईन संगणक प्रणालीत नोंदी घेण्याची कार्यवाही करणेत येणार आहे. त्यामुळे अशा दिनांक 31 डिसेंबर 2023 पूर्वी नोंद असलेल्या मालमत्तेचा उतारा देखील नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध होईल.

सदर सुविधा मनपाचे संकेत स्थळावरील मुख्य पृष्ठावर नागरिक या लिंकमध्ये मिळकत कर या लिंकवर ऑनलाईन उतारा येथे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नागरिकांनी स्वत:चा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा. नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावरील आलेला ओटीपी नोंदविल्यानंतर ज्या मालमत्ताधारकांनी संपूर्ण मालमत्ता कराचा भरणा केलेल्या आहे, अशा मालमत्ताधारकांना मालमत्ता क्रमांक नमूद केलेनंतर ऑनलाईन मालमत्ता उतारा फी रक्कम रुपये 20/- भरणा करुन दाखला प्राप्त होणार आहे. विभागीय कार्यालयामार्फत देण्यात येणारा मालमत्ता नोंदीचा उतारा सुविधा यापुढे फक्त ऑनलाईन पध्दतीने सुरु राहील. तथापि अपवादात्मक / न्यायालयीन / शासकीय कामकाज याकरिता प्रशासन अधिकारी यांचे मान्यतेने देणेत येईल, याची नोंद घ्यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जाहिरात क्रमांक :
जावक क्रमांक : कर/मुख्य/09/कावि/४०१/2023
दिनांक : 29 /12/2023